ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०००च्या
अंमलबजावणीबाबत ...

# महाराष्ट्र शासन

## पर्यावरण विभाग

क्रमांक.ध्वनीप्र २००९/प्र.क्र.१२/०८/तां.क.१
१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३१ जुलै, २०१३.

**वाचा :-**१) केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रलयाची अधिसूचना क्र.एसओ १२३(ई), दि.१४.२.२००८.
२) शासन निर्णय समक्रमांक दिनांक १६.८.२०००.
३) शासन निर्णय समक्रमांक दिनांक १५.६.२००१.
४) केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रलयाची अधिसूचना क्र.एसओ १०८८(ई), दि.११.१०.२००२
५) शासन निर्णय क्रमांक-ध्वनीप्र २०००/प्र.क्र.२४/तां.क.२(भाग-३) दिनांक ७.३.२००३.
६) शासन निर्णय क्रमांक-ध्वनीप्र २००८/प्र.क्र.१३/०८/तां.क.१, दिनांक २८.४.२००८.

**प्रस्तावना :-** केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०००च्या परिच्छेद ५(२) नुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर श्रोतृगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी (रात्री १० वा.पासून सकाळी ६ वाजेपर्यंत) करता येत नाही. या नियमामध्ये दि.११.१०.२००२ रोजीच्या अधिसूचनेन्वये केंद्र शासनाने सुधारणा केली असून नियम ५ मध्ये उपनियम (३) चा नव्याने समावेश करण्यात आलेला आहे. त्यान्वये ध्वनी प्रदूषणाची पातळी विहित मर्यादेत राखून वर्षभरामध्ये १५ दिवस ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर श्रोतृगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी रात्री १० वाजेपर्यंत ऐवजी रात्री १२ वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम व धार्मिक सणांकरिता करता येऊ शकेल. तथापि वर्षभरातील १५ दिवस कोणते हे ठरविण्याची जबाबदारी राज्य शासनावर होती. ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक वापरासाठी वर्षभरातील १५ दिवसांसाठी वेळेत सूट देण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विधाराधीन होता.

**शासन निर्णय :-** ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०००च्या नियम ५(३) नुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर श्रोतृगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी खालीलप्रमाणे १५ दिवसांसाठी फक्त ध्वनीची विहित मर्यादा राखून सकळी ६ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंत करता येईल :-

| | |
|---|---|
| शिवजयंती | : १ दिवस |
| ईद-ए-मिलाद | : १ दिवस |
| डॉ.आंबेडकर जयंती | : १ दिवस |
| १ मे, महाराष्ट्र दिन | : १ दिवस |
| गणपती उत्सव | : ४ दिवस (संबंधित ध्वनी प्रदुषण नियंत्रण प्राधिकरण व जिल्हाधिकारी यांनी कायदा व सुव्यवस्था लक्षात घेऊन प्रत्येक वर्षी गणेशोत्सवाच्या १ महिना आधी हे दिवस निश्चित करुन जाहिर करावेत.) |
| नवरात्री उत्सव | : २ दिवस (अष्टमी व नवमी) |
| दिवाळी | : १ दिवस (लक्ष्मीपूजन) |

ROTA CR 12 TC 1 H 1674 (500-8-2013)

(पृ.मा.प.

खिस्मस : १ दिवस
३१ डिसेंबर : १ दिवस
उर्वरीत २ दिवस : संबंधित ध्वनी प्राधिकरणाच्या सल्ल्याने जिल्हाधिकारी यांनी स्थानिक धार्मिक उत्सव व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी त्या क्षेत्रातील लोकांच्या मागणीनुसार परवानगी द्यावी.

जिल्ह्यातील नगरपालिका / महानगरपालिका क्षेत्रात २ दिवसांपेक्षा जास्त दिवस सर्वसाधारण कार्यक्रमास परवानगी देता येणार नाही. मुंबई जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा क्षेत्रात प्रत्येकी २ दिवसासाठी परवानगी राज्य शासनाच्या सहमतीने दिली जाईल. जिल्ह्यातील इतर भागामध्ये २ दिवसांसाठी परवानगी देतांना ध्वनीप्रदूषण नियंत्रण प्राधिकरण व जिल्हाधिकारी यांनी निर्णय घ्यावा. वरीलप्रमाणे ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्याबाबतची सूट १५ दिवसांपेक्षा जास्त होणार नाही याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व ध्वनी प्रदूषण नियंत्रण प्राधिकरण यांची राहील. अशा प्रकारची परवानगी देतांना ध्वनी प्रदूषण नियम २००० मधील नियम ३ व ४ चे पालन करण्यात यावे. ध्वनी प्रदूषण नियम २००० अंतर्गत स्थापन केलेल्या ध्वनी प्राधिकरणाने त्यांच्याकडे प्राप्त तक्रारींचा व त्यावर केलेल्या कार्यवाहीचा त्रैमासिक अहवाल राज्य शासनास पाठवावा. या शासन निर्णयान्वये, पर्यावरण विभागाने यापूर्वी दि.२८ एप्रिल, २००८ रोजी या विषयाबाबत निर्गमित केलेला शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे.

हे आदेश शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(डॉ.बी.एन.पाटील)
संचालक (पर्यावरण)

प्रति,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.मंत्री व राज्यमंत्री, पर्यावरण यांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव
अपर मुख्य सचिव, गृह विभाग
प्रधान सचिव, गृह विभाग
प्रधान सचिव, सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य विभाग
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
सर्व जिल्हाधिकारी
सर्व पोलीस आयुक्त
सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक
सर्व मंत्रालयीन विभाग
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय (प्रसिध्दीसाठी)
संचालक, मुंबई दूरदर्शन (प्रसिध्दीसाठी)
संचालक, आकाशवाणी, मुंबई (प्रसिध्दीसाठी)

—oxo—

H 1674-1 w.
CR 12 TC 1